नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३४६ Issue - 346 | वार शनिवार दि. ९ मे २०२६ Blow- Saturday Date 9 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; भूजल पातळी वाढविण्यासाठी कामे करण्याचे निर्देश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण तसेच जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गतची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावीत. तसेच भूजल पातळी कमी झालेल्या ठिकाणी प्राधान्याने कामे करून तेथील भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी मृद व जलसंधारण विभागाचा आढावा घेतला. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे जल-विषयक सल्लागार श्रीराम वेदिरे, विशेष कार्य अधिकारी प्रिया खान, मृद व जलसंधारण आयुक्त अंजली रमेश, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एल निनोच्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी जलसंधारण, जलयुक्त शिवारमधील कामांचे प्राधान्य ठरवून ती पूर्ण करण्यात यावीत. तसेच जलयुक्त शिवार २.० अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये दुरुस्तींच्या कामांची निकड पाहून ही कामे आराखड्यात समाविष्ट करून तातडीने पूर्ण करावीत. जलयुक्तमधील राज्यस्तरीय आराखडे १५ मे पूर्वी मंजूर करण्यात यावेत. तसेच जिल्ह्यांना सुधारित आराखडे देऊन कामांना गती द्यावी. जलयुक्त शिवारची कामे हाती घेतलेल्या गावांबाहेरील १० टक्के कामेही प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यात यावीत.

केंद्र शासनाच्या 'विकसित भारत जी राम जी' योजनेमध्ये जलसंधारणाच्या कामांवर भर देण्यात आला आहे. त्याचा लाभ घेऊन राज्यातील जलसंधारणाची कामे पूर्ण करून घ्यावीत. जलसंधारण कामाअंतर्गत नालाखोलीकरणची कामे करताना त्याठिकाणी पुन्हा गाळ होऊ नये, यासाठी नाल्याच्या ठिकाणी बांबू लागवड करण्याचा विचार करावा. विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे जून महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करावे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत वाढीव निधी मिळण्यासाठी केंद्रीय मंत्री यांना स्वतः भेटणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले की, मृद व जलसंधारण विभागाच्या आकृतीबंधाला मंजुरी मिळाल्याने आता कामास गती येईल. आतापर्यंत मंजुरी दिलेली कामे पूर्ण करण्यावर भर देण्यात येत आहे. तसेच मूळ आराखड्यानुसारच कामे पूर्ण व्हावीत यासाठी मार्गदर्शक सूचना तयार केल्या आहेत. मालगुजारी तलावांच्या ठिकाणी असलेली अतिक्रमणे काढण्याची परवानगी मिळावी.

सचिव पापळकर यांनी सांगितले की, जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत विशेष निधी व अभिसरणअंतर्गत आतापर्यंत गाव आराखड्याप्रमाणे १ लाख ४४ हजार ६९७ कामे मंजूर झाली आहेत. त्यापैकी १ लाख १० हजार १२० कामे पूर्ण झाली आहेत. ऊर्वरित कामे प्रगतीपथावर असून लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

एल निनोच्या पार्श्वभूमीवर टँकरग्रस्त आणि भूजल पातळी खालावलेल्या गावांमध्ये प्राधान्याने कामे हाती घेण्यात आली आहेत. तसेच विविध योजनाअंतर्गत पाणलोट क्षेत्रात झालेल्या मृद व जलसंधारण कामांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी करण्याचे काम सुरू असून आतापर्यंत १५ लाख १५ हजार कामांपैकी १२ लाख २७ हजार संरचनांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी झाली आहे.गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अंतर्गत यावर्षी १४३५ जलसाठ्यातून ४७७.७३ लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला आहे. त्यामुळे ३०८३५ सघमी पाणीसाठा पुनर्स्थापित झाला असून ७३ हजार ४१७ एकर क्षेत्र सुपिक झाले आहे. या वर्षी १५ जून पर्यंत जिल्हानिहाय गाळ काढण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत आतापर्यंत २२ हजार कामे पूर्ण झाली असून त्यांचे जिओ टॅगिंग करण्यात आले आहे. तसेच पाणलोट विकास घटकांतर्गत ५७ अमृत सरोवर तयार करण्यात येत असून १५ जूनपर्यंत ३१ अमृत सरोवर पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

# भारताची संरक्षण क्षेत्रात मोठी झेप! ओडिशात स्वदेशी टीएआरए ग्लाइड शस्त्र प्रणालीची यशस्वी चाचणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




ओडिशा : ओडिशाच्या किनारपट्टीवर भारताने संरक्षण तंत्रज्ञान क्षेत्रात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. Defence Research and Development Organisation (डीआरडीओ) आणि भारतीय हवाई दल यांनी संयुक्तपणे टॅक्टिकल डव्हान्स्ड रेंज ऑगमेंटेशन अर्थात 'टीएआरए' शस्त्र प्रणालीची पहिली यशस्वी उड्डाण चाचणी पार पाडली. ही भारताची पहिली स्वदेशी ग्लाइड शस्त्र प्रणाली मानली जात असून, पारंपरिक नियंत्रण प्रणाली नसलेल्या स्फोटकांना अत्यंत अचूक लक्ष्यभेदी शस्त्रांमध्ये रूपांतरित करण्याची क्षमता या प्रणालीमध्ये आहे.

'टीएआरए' ही एक मॉड्युलर प्रणाली असून, कमी खर्चात अधिक अचूकता आणि मारक क्षमता मिळवून देण्यासाठी तिची निर्मिती करण्यात आली आहे. या प्रणालीमुळे पारंपरिक बॉम्ब आणि स्फोटकांचे रूपांतर आधुनिक 'प्रिसिजन गाईडेड वेपन्स'मध्ये करता येणार आहे. विशेष म्हणजे, शत्रूच्या जमिनीवरील लक्ष्यांवर दूर अंतरावरून अचूक हल्ला करण्यासाठी ही प्रणाली अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

या अत्याधुनिक प्रणालीची रचना आणि विकास Research Centre Imarat (आरसीआय), हैदराबाद यांनी डीआरडीओच्या इतर प्रयोगशाळांच्या सहकार्याने केला आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि कमी खर्चातील प्रणालींचा वापर करून तयार करण्यात आलेले हे भारतातील पहिले ग्लाइड शस्त्र असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकल्पात 'डेव्हलपमेंट कम प्रॉडक्शन पार्टनर्स' तसेच अनेक भारतीय उद्योगांनीही सहभाग घेतला आहे. विशेष बाब म्हणजे, या प्रणालीच्या उत्पादन प्रक्रियेलाही भारतीय कंपन्यांनी सुरुवात केली असून 'मेक इन इंडिया' आणि आत्मनिर्भर भारत अभियानाला यामुळे मोठे बळ मिळणार आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी या यशस्वी चाचणीबद्दल डीआरडीओ, भारतीय हवाई दल आणि उद्योग क्षेत्राचे अभिनंदन केले. भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतांना बळकटी देणारे हे एक ऐतिहासिक पाऊल आहे, असे ते म्हणाले. दरम्यान, संरक्षण संशोधन आणि विकास विभागाचे सचिव तसेच डीआरडीओचे अध्यक्ष समीर कामत (डराळी त. घरारीं) यांनीही या मोहिमेत सहभागी सर्व वैज्ञानिक, अभियंते आणि तांत्रिक पथकांचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, भविष्यात भारतीय सैन्याच्या ऑपरेशनल क्षमतांमध्ये ही प्रणाली मोठी भर घालणार आहे. संरक्षण तज्ज्ञांच्या मते, 'टीएआरए' प्रणालीमुळे भारतीय हवाई दलाला युद्ध परिस्थितीत अधिक सुरक्षित आणि अचूक हल्ले करण्यास मदत होईल. कमी खर्चात विकसित करण्यात आलेली ही प्रणाली भविष्यात निर्यातीसाठीही महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळे भारताच्या संरक्षण उद्योगाला जागतिक स्तरावर नवे स्थान मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# तमिळनाडूत थलपती विजय यांचा मास्टरस्ट्रोक! एका झटक्यात फिरवला गेम, सत्तास्थापनेचा पेच अखेर सुटला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तमिळनाडू : तमिळनाडूच्या राजकीय मैदानातून एक अत्यंत महत्त्वपूर्ण घडामोड समोर येत आहे. अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय सस्पेन्सवर आता पडदा पडणार असून, सुपरस्टार 'थलापथी' विजय यांच्या 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) पक्षाचा सत्तास्थापनेचा मार्ग अखेर सुकर झाला आहे. नुकत्याच पार पडलेल्या तमिळनाडू विधानसभा निवडणुकांनी राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप घडवून आणला. द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांसारख्या दशकांपासून राज्यावर अधिराज्य गाजवणाऱ्या प्रस्थापित पक्षांना विजय यांच्या 'टीव्हीके'ने अक्षरशः धूळ चारली. या निवडणुकीत 'टीव्हीके'ने तब्बल १०८ जागांवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करत सर्वांत मोठा पक्ष बनण्याचा मान मिळवला. दुसरीकडे, या राजकीय लाटेत सत्ताधारी द्रमुक आणि अण्णाद्रमुकचा दारुण पराभव झाला असून, खुद्द विद्यमान मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनाही पराभवाचा धक्कादायक सामना करावा लागला आहे. सर्वाधिक जागा मिळवूनही 'टीव्हीके'समोर बहुमताचे मोठे आव्हान उभे होते. तमिळनाडूच्या



विधानसभेत सत्ता स्थापन करण्यासाठी ११८ या जादुई आकड्याची आवश्यकता असते. १०८ जागा जिंकलेल्या विजय यांना बहुमतासाठी आणखी १० आमदारांची गरज होती. अशा वेळी काँग्रेस पक्षाने पाठिंब्याचा हात पुढे केल्याने 'टीव्हीके'चे संख्याबळ ११२ वर पोहोचले. तरी-ही सत्तेच्या चाव्या मिळवण्यासाठी ६ आमदारांची वाणवा होतीच. या संख्याबळाच्या जोरावर विजय यांनी सलग दोन वेळा राज्यभवनावर धडक देत सत्तास्थापनेचा दावाही केला होता. मात्र, राज्यपालांनी घटनात्मक नियमांवर बोट ठेवत त्यांना पूर्ण ११८ आमदारांच्या पाठिंब्याचे स्वाक्षरीयुक्त पत्र सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. त्यावेळी प्रत्यक्षात केवळ ११२ आमदारांचेच संख्याबळ असल्याने विजय आणि त्यांच्या पक्षासमोर मोठा पेच निर्माण झाला होता.

# सोशल मीडियावर बदनामी करणे महागात पडणार, कायद्यात बदल करण्यासाठी राज्य सरकारकडून उच्चस्तरीय समितीची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचा वापर करून पुराव्यांविना केली जाणारी बदनामी आणि त्यातून निर्माण होणारे गंभीर सामाजिक प्रश्न विचारात घेऊन राज्य सरकारने शुक्रवारी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. समाजमाध्यमांवरील अशा स्वैर प्रकरणांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि सध्याच्या कायदेशीर तरतुदींचा अभ्यास करून प्रभावी उपाययोजना सुचवण्यासाठी राज्य पोलीस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची घोषणा गृह विभागाने केली आहे.

राज्यात सोशल मीडियावरून बदनामी करण्याचे प्रमाण वाढल्याने समाजातील सर्व घटकांना त्याचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील कलम ६६-अ रद्द झाल्यानंतर निर्माण झालेली कायदेशीर पोकळी भरून काढण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली आहे. विद्यमान कायद्यात सुधारणा करणे किंवा राज्याचा स्वतंत्र कायदा आणणे शक्य आहे का, याची तांत्रिक व कायदेशीर पडताळणी करण्याची जबाबदारी या समितीवर सोपवण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी राज्याचे पोलीस महासंचालक असतील. त्यांच्यासोबत विधि व न्याय, माहिती तंत्रज्ञान आणि महिला व बाल विकास विभागाचे प्रधान सचिव हे सदस्य म्हणून जबाबदारी सांभाळतील, तर अपर पोलीस महासंचालक (राज्य सायबर) हे या समितीचे सदस्य सचिव असतील.

## उपमुख्यमंत्रिपदी महिला, मंत्रिमंडळात 'महाराष्ट्र पॅटर्न'

# पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदी सुवेंदू अधिकारी निश्चित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोलकाता : पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसला आस्मान दाखवल्यानंतर भारतीय जनता पक्ष निर्विवादपणे सत्ता स्थापन करण्याच्या तयारीत आहे. पश्चिम बंगालमधील भाजपच्या पहिल्या वहिल्या सरकारमध्ये मुख्यमंत्री म्हणून सुवेंदू अधिकारी कार्यभार सांभाळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याशिवाय राज्यात दोन उपमुख्यमंत्री असतील. उपमुख्यमंत्रिपदासाठी रुपा गांगुली यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. तर दुसरे उपमुख्यमंत्री उत्तर बंगालमधील एक पुरुष प्रतिनिधी असतील.

अधिकारींकडे गृह मंत्रालय निश्चित

सुवेंदू अधिकारी यांच्याकडे गृह मंत्रालयाचा कार्यभार असेल. महाराष्ट्रात ज्याप्रमाणे मुख्यमंत्र्यांकडे गृह मंत्रिपद आहे, तोच पॅटर्न कायम राहण्याची शक्यता आहे. तर एकाच पक्षाचे सरकार असूनही महाराष्ट्राप्रमाणे दोन उपमुख्यमंत्र्यांचा समावेश असेल. यापैकी एक महिला उपमुख्यमंत्री असण्याची चिन्हं आहेत. विधिमंडळ पक्षाच्या बैठकीनंतर, सायंकाळी ५ वाजता याबाबत अधिकृत घोषणा केली जाईल. सुवेंदू अधिकारी यांनी भवानीपूरमध्ये मावळत्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव केला. त्यांनी नंदीग्राममधूनही सलग दुसऱ्यांदा निवडणूक जिंकली आहे; याच मतदारसंघातून त्यांनी २०२१ मध्ये ममता यांचाच पराभव केला होता.

पश्चिम बंगालमधील भारतीय जनता पक्षाच्या विजयाचे बिनीचे शिलेदार ठरलेले सुवेंदू अधिकारी मुख्यमंत्रिपदाचे प्रमुख दावेदार मानले जात होते. भवानीपूर मतदारसंघात तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा यांच्याविरोधात त्यांनी अटीतटीची लढत दिली.

विद्यार्थी चळवळीतून राजकारणात प्रवेश करणारे सुवेंदू एके काळी ममता बॅनर्जी यांचे सहकारी होते. १९९८ मध्ये त्यांनी तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि २००६ मध्ये कांती दक्षिण मतदारसंघातून ते आमदार म्हणून विधानसभेत दाखल झाले होते. त्यांचे वडील शिशिर अधिकारी काँग्रेस पक्षाचे प्रभावशाली नेते होते आणि तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होते.

अधिकारी यांच्या घराण्याचा पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यात दबदबा आहे. सुवेंदू यांनी वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून, काँग्रेस पक्षातून राजकारणाला सुरुवात केली. सुरुवातीला पूर्व मेदिनीपूरमधील कांती पालिकेत ते नगरसेवक झाले. त्यानंतर १९९८ मध्ये त्यांनी ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पुढे २००६ मध्ये कांती दक्षिण विधानसभा मतदारसंघातून ते आमदार म्हणून निवडून आले. २००७ मध्ये सुवेंदू अधिकारी हे ममता बॅनर्जी यांचे प्रमुख सहकारी म्हणून पुढे आले. नंदीग्राम येथील आंदोलनात त्यांनी ममतांसोबत भाग घेतला. नंदीग्राममध्ये तत्कालीन डाव्या सरकारने प्रस्तावित केलेल्या 'सेझ' प्रकल्पाच्या भूसंपादनाला त्यांनी विरोध केला. या आंदोलनातील समितीचे नेतृत्व अधिकारी यांनी केले. या आंदोलनात १४ मार्च २००७ रोजी पोलिसांच्या गोळीबारात १४ आंदोलकांचा मृत्यू झाला आणि राज्यभर असंतोष पसरला. नंदीग्राममधील आंदोलन; तसेच शेजारील हुगळी जिल्ह्यातील सिंगूर येथील टाटा मोटर्सच्या प्रकल्पाच्या विरोधातील आंदोलन यांमुळे २०११ मध्ये डाव्या पक्षांची ३४ वर्षांची राजवट संपुष्टात आली आणि तृणमूल काँग्रेस पक्ष सत्तेवर आला. त्या स्थित्यंतरात ममता बॅनर्जी यांच्यासोबत सुवेंदू अधिकारी प्रमुख भूमिकेत होते. त्यानंतर अधिकारी यांना तृणमूल काँग्रेसने लोकसभेत पाठवले. २००९ आणि २०१४ च्या लोकसभा निवडणुकांत ते तामलुक मतदारसंघातून खासदार झाले. २०१६ मध्ये तृणमूल काँग्रेसच्या दुसऱ्या विजयानंतर ममतांनी सुवेंदू यांना राज्यातील मंत्रिमंडळात स्थान दिले होते. तृणमूलमध्ये त्या वेळी ते दुसऱ्या क्रमांकाचे नेते होते. मात्र, ममतांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्या पक्षातील उदयानंतर सुवेंदू यांचे पक्षात मतभेद



होऊ लागले. पक्षात २०१९ नंतर रणनीतीकार म्हणून काम सुरू केलेले प्रशांत किशोर यांच्याशीही त्यांचे वाद झाले. त्यानंतर डिसेंबर २०२० मध्ये सुवेंदू यांनी तृणमूल काँग्रेसला रामराम करून भाजपमध्ये प्रवेश केला. त्यानंतर भाजपने त्यांना पक्ष संघटनेत महत्त्वाची जबाबदारी दिली. गेल्या निवडणुकीत भाजपला ७७ जागा जिंकता आल्या होत्या. सुवेंदू अधिकारी पश्चिम बंगाल विधानसभेत विरोधी पक्षनेते झाले. आता राज्यात सत्तांतर झाल्यानंतर ते मुख्यमंत्रिपदाचे प्रमुख दावेदार म्हणून समोर आले. आता पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांची १५ वर्षांची सत्ता संपुष्टात आली असून, भाजपने एकहाती सत्ता मिळवली आहे. या सत्तांतरामध्येही सुवेंदू अधिकारी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे २०११ मधील सत्तांतर ते २०२६ मधील सत्तांतर असे सुवेंदू यांच्या कामगिरीचे वर्तुळ पूर्ण झाले आहे.

## संपादकीय....

### पेचप्रसंगाचा शेवट

तमिळनाडूच्या राजकीय मैदानातून एक अत्यंत महत्त्वपूर्ण घडामोड समोर येत आहे. अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय सस्पेन्सवर आता पडदा पडणार असून, सुपरस्टार 'थलापथी' विजय यांच्या 'तमिळगा वेत्री कळघम' (टीव्हीके) पक्षाचा सत्तास्थापनेचा मार्ग अखेर सुकर झाला आहे. नुकत्याच पार पडलेल्या तमिळनाडू विधानसभा निवडणुकांनी राज्याच्या राजकारणात मोठा भूकंप घडवून आणला. द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांसारख्या दशकांपासून राज्यावर अधिराज्य गाजवणार्या प्रस्थापित पक्षांना विजय यांच्या 'टीव्हीके'ने अक्षरशः धूळ चारली. या निवडणुकीत 'टीव्हीके'ने तब्बल १०८ जागांवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करत सर्वांत मोठा पक्ष बनण्याचा मान मिळवला. दुसरीकडे, या राजकीय लाटेत सत्ताधारी द्रमुक आणि अण्णाद्रमुकचा दारुण पराभव झाला असून, खुद्द विद्यमान मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनाही पराभवाचा धक्कादायक सामना करावा लागला आहे. याबाबतची अधिकृत घोषणा खुद्द विजय आज सायंकाळी एका विशेष पत्रकार परिषदेत करण्याची शक्यता आहे. सर्वाधिक जागा मिळवूनही 'टीव्हीके'समोर बहुमताचे मोठे आव्हान उभे होते. तमिळनाडूच्या विधानसभेत सत्ता स्थापन करण्यासाठी ११८ या जादुई आकड्याची आवश्यकता असते. १०८ जागा जिंकलेल्या विजय यांना बहुमतासाठी आणखी १० आमदारांची गरज होती. अशा वेळी काँग्रेस पक्षाने पाठिंब्याचा हात पुढे केल्याने 'टीव्हीके'चे संख्याबळ ११२ वर पोहोचले. तरीही सत्तेच्या चाव्या मिळवण्यासाठी ६ आमदारांची वाणवा होतीच. या संख्याबळाच्या जोरावर विजय यांनी सलग दोन वेळा राज्यभवनावर धडक देत सत्तास्थापनेचा दावाही केला होता. मात्र, राज्यपालांनी घटनात्मक नियमांवर बोट ठेवत त्यांना पूर्ण ११८ आमदारांच्या पाठिंब्याचे स्वाक्षरीयुक्त पत्र सादर करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. त्यावेळी प्रत्यक्षात केवळ ११२ आमदारांचेच संख्याबळ असल्याने विजय आणि त्यांच्या पक्षासमोर मोठा पेच निर्माण झाला होता. अखेर सत्तास्थापनेचा हा गुंता आता पूर्णपणे सुटल्याचे चित्र आहे. विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीपीआय आणि सीपीएम या दोन्ही प्रमुख डाव्या पक्षांनी 'टीव्हीके'ला आपला अधिकृत पाठिंबा जाहीर करण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या राजकीय समीकरणांमुळे थलापथी विजय यांनी सत्तास्थापनेसाठी आवश्यक असलेला ११८ आमदारांचा बहुमताचा जादुई आकडा यशस्वीरित्या गाठला आहे. या बहुमताच्या जुळवाजुळवीपूर्वी राजकारणात अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. सुरुवातीला बहुमताचा आकडा गाठण्यासाठी थलापथी विजय यांनी थेट अण्णाद्रमुकशी (खऊच्चघ) संपर्क साधून त्यांच्याकडे पाठिंब्याची मागणी केली होती. मात्र, अण्णाद्रमुकने विजय यांच्या या प्रस्तावाला स्पष्ट शब्दांत नकार दिला. यामुळे, निवडणुकीत सर्वांत मोठा पक्ष म्हणून उदयास येऊनही 'टीव्हीके'ला सत्तेबाहेर राहावे लागणार की काय, अशी साशंकता राजकीय वर्तुळात निर्माण झाली होती. परंतु, आता काँग्रेस आणि डाव्या पक्षांच्या भक्कम साथीने विजय यांनी हे कठीण वाटणारे बहुमताचे गणित यशस्वीपणे सोडवले असून, तमिळनाडूत नव्या पर्वाची सुरुवात होण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

# तुळजापूर येथील सैनिक स्कूल येथे ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूरच्या वार्षिक प्रशिक्षणास प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : दि .०६ मे २०२६ रोजी श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तुळजापूर येथे ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूरच्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ झाला असून सदर शिबीर ०५ ते १४ मे २०२६ पर्यंत चालणार आहे.या कँम्पचे कँम्प कमांडंट कर्नल संतोष नवगण, डेप्युटी कँप कमांडंट वाय.बी.सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली एनसीसी कँम्प चालणार आहे . कॅडेसटना विविध प्रकारचे सैनिकी प्रशिक्षण दिले जाणार आहे. या वार्षिक प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना कर्नल संतोष नवगण यांनी एनसीसी कॅडेटना एकता व अनुशासन याचे पालन करून राष्ट्र निर्मिती देशाच्या सामाजिक



विकासासाठी एनसीसी कॅडेट यांनी आपले योगदान द्यावे असे आवाहन केले. या कॅम्पसाठी श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयचे प्राचार्य डॉ. वैजनाथ घोडके यांनी कँपसाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे सर्वप्रथम आभार मानले.

या कँपचा मुख्य उद्देश २६ जानेवारी २०२७ मध्ये होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी एनसीसी कॅडेट्सची निवड तसेच दिल्ली येथे होणाऱ्या थल सैनिक कँम्पसाठी निवड केली जाणार आहे. या एनसीसी कॅडेट्सना ड्रिल, फायरिंग, सांस्कृतिक कार्यक्रम, फ्लॅग एरिया, खेळ, ऑब्सिटिकल, सायबर क्राईम, बेस्ट कॅडेट, अग्निशमक, आपती निवारण, आरोग्य सुरिक्षितता इत्यादी विषयाचा सराव करून प्रशिक्षण दिले जाणार आहे. या कॅम्प दरम्यान कॅडेट्सना सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन त्याचबरोबर विविध खेळाचे आयोजन केले आहे. या कँपमध्ये लातूर व धाराधिव जिल्ह्याचे शाळा व महाविद्यालयातील जवळपास ४५० एनसीसी कॅडेटस सहभागी झाले आहेत. या कॅम्पच्या यशस्वीतेसाठी सुभेदार मेजर शंभू सिंह, कॅप्टन डॉ चिट्टमपल्ले ज्ञानेश्वर, लेफ्टनंट हरिभाऊ पावडे, घोरपडे अमरसिंह, कुंभार व्ही बी, राजोळे सचिन, संतोष पाटील, हरेंदर सिंग, संजय चिकने, देशराज सिंह, बाजीराव पाटील, सुनिल काळे तसेच कार्यालयीन हेड क्लर्क घोगरे बी व्ही, पवार आर आर आर्मी स्टाफ, कार्यालयीन कर्मचारी अथक परिश्रम घेत आहेत.

# शेत पाणंद रस्त्यांना प्राधान्य देऊन ग्रामीण रोजगाराला गती द्यावी : रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रोजगार हमी योजना विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या मातोश्री ग्राम समृद्धी शेत पाणंद रस्त्यांच्या कामांना प्राधान्य देऊन तसेच या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करुन ग्रामीण रोजगाराला गती देण्याचे निर्देश रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी संबंधित यंत्रणांना दिले. ग्रामीण भागातील रोजगार निर्मिती, शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा आणि ग्राम विकासाला गती देण्याच्या दृष्टीने मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात विभागीय आढावा बैठक घेण्यात आली.

मंत्री भरत गोगावले यांनी विविध जिल्ह्यांतील रोजगार हमी योजनेच्या अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करत सध्या सुरू असलेल्या मनरेगा व मातोश्री ग्राम समृद्धी योजनेंतर्गत कामांचा जिल्हानिहाय आढावा घेतला. यामध्ये रोजगार हमी योजनेतील नोंदणीकृत मजुरांची संख्या, प्रत्यक्ष सुरू असलेली कामे, प्रलंबित मंजुरी, निधी वापर, तसेच शेत पाणंद रस्त्यांच्या कामांबाबतची सद्यस्थिती यावर सखोल चर्चा करण्यात आली. यावेळी बोलताना मंत्री भरत गोगावले म्हणाले, केंद्र शासनाने व्ही.बी.जी राम जी अधिनियम २०२५ पारित केला असला तरी सदर अधिनियम अद्याप अंमलात आलेला नसून मनरेगा योजना पूर्ववत सुरू आहे. त्यामुळे विद्यमान कार्यपद्धतीनुसार सर्व कामे वेळेत आणि नियमबद्ध पद्धतीने पूर्ण करणे आवश्यक आहे. तसेच केंद्र शासनाकडून मनरेगा कामांसाठी कोणतीही अंतिम कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शेत पाणंद रस्त्यांची कामे ही राज्य शासनाची प्राधान्याची योजना असल्याचे सांगत मंत्री भरत गोगावले यांनी या कामांमध्ये अधिक गतिमानता आणण्याचे निर्देश दिले. ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी व ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या मागण्या आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन शासनस्तरावर मोठ्या प्रमाणात शेत पाणंद रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली आहेत. क्षेत्रीय स्तरावर या कामांच्या अंमलबजावणीस गती द्यावी, असे त्यांनी सांगितले. मंजूर कामांची अंदाजपत्रके तातडीने तयार करून त्यांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात यावी तसेच संबंधित कामांचे वर्ककोड तत्काळ तयार करून कार्यारंभ आदेशासह हजेरीपत्रके निर्गमित करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सुरू असलेल्या कामांची उर्वरित हजेरीपत्रके देखील त्वरित निर्गमित करून कामांचे मोजमाप घेऊन देयके नरेगासॉफ्ट प्रणालीवर विनाविलंब नोंदविण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. केंद्र शासनाने जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने ग्राम पंचायत स्तरावर २० पेक्षा अधिक कामे सुरू करण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे शासनमान्य शेत पाणंद रस्त्यांच्या कामांना प्राधान्याने मंजुरी देण्याचे निर्देश मंत्री गोगावले यांनी दिले. संभाव्य 'एल निनो' परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करण्यासाठी शेत पाणंद रस्त्यांच्या कामांवर विशेष भर देण्याचेही त्यांनी सांगितले. या बैठकीस रोजगार हमी योजना विभागाचे सचिव आप्पासाहेब धुळाज यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# कळंबमध्ये 'राष्ट्रचिंतन अभियान' अंतर्गत महर्षी गज अरविंद यांचे व्याख्यान संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : हिंदराष्ट्र ऑर्गनायजेशनच्या वतीने 'राष्ट्रचिंतन अभियान' अंतर्गत विशेष चर्चा सत्राचे आयोजन गुरुवार, दि.७ मे २०२६ रोजी कळंब येथील विद्याभवन हायस्कूल सभागृहात दुपारी ४ ते ६ या वेळेत करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष महादेव महाराज अडसूळ हे होते. तर मंचावर हिंद राष्ट्रसंघाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष राधाताई सपकाळ, ज्येष्ठ पत्रकार माधवसिंग राजपूत यांची उपस्थिती होती. या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक महर्षी गज अरविंद यांनी कृषी, आरोग्य व शिक्षण या महत्त्वाच्या विषयांवर सखोल



मार्गदर्शन केले व त्यांनी हा विषय स्क्रीन प्रोजेक्टरच्या माध्यमातून आणखीन स्पष्ट समजावून सांगितला. यामध्ये त्यांनी आपणे प्राणोसे राष्ट्र बडा होता है, हम मिटते है, तो राष्ट्र खडा होता हैं, असे सांगून त्यांनी हिंद राष्ट्र संकल्पना समजावून सांगितली राष्ट्र मजबूत होण्यासाठी शांतता व स्थिरता आवश्यक आहे व यातून विकास होतो. या प्रसंगी त्यांनी आंतरिक विकास व बाह्य विकास या विषयी सांगितले. अंतरीक विकासात नैतिक मूल्य, व्यक्तित्व कौशल्य, चेतना बुद्धी, मन तर बाह्य विकासात शरीर, कृषीत्व स्वरूप, स्वास्थ स्वरूप, शिक्षा स्वरूप व कार्य या विषयी विचार व्यक्त केले. सारा विश्व एक हो परिवार , मानवता धर्म , हिंद संस्कृती मध्ये मानवतेचे दर्शन होते असे सांगितले. या प्रसंगी माधवसिंग राजपूत यांनी हिंद ही संकल्पना समजून घेणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. या देशातल्या ऋषीमुनी व महामानवानी आपल्या विचारातून कार्यातून या भूमीत मानवता एकता व विश्वकल्याणाचे विचार पेरले आहेत असे सांगितले. तर समारोप प्रसंगी महादेव महाराज महाराज यांनी मार्गदर्शक गज अरविंद साधू संतांनी आपणास विचार दिले आहेत, या विचाराच्या मार्गाने चालले पाहिजे नाहीतर आपला विनाश अटळ आहे. हिंदुराष्ट्र संकल्पना विश्वस्वरूपी आहे असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन हिंद राष्ट्र ऑर्गनायझेशनचे कळंब तालुका अध्यक्ष अंकुश कसबे, यांनी केले तर आभार नितेश पवार यांनी मानले. या प्रसंगी प्रवीण मुंडे, उमेश कसबे, किशोर गोरे, रामदास सपकाळ, निलेश पवार, संजय क्षिरसागर यांच्या सह नागरिकांची उपस्थिती होती.

# टाकळीवाडी जागृत लक्ष्मी देवीची यात्रा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



टाकळीवाडी/प्रतिनिधी : टाकळी वाडी ता.शिरोळ येथील गावच्या पश्चिम सीमेला श्री लक्ष्मी देवीचे देवस्थान असून १९७५ साली मंदिराची स्थापना झाली आहे. गावातील एक जागृत देवस्थान म्हणून या देवींची प्रचिती आहे. दरवर्षी मे महिन्यात या देवीची यात्रा मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा केला जातो.

पाऊस काळ चांगला व्हावा म्हणून सर्व ग्रामस्थ लक्ष्मी कडे मागणं घालतात.

टाकळीवाडी गावातील शेतकरी गोरगरीब ग्रामस्थ या देवीला नवस बोलतात. नवसाला पावणारी लक्ष्मी अशी तिची प्रचिती आहे. गावातील श्री मसोबा देवाचे पुजारी खोत यांच्याकडेच या देवीची पूजा आहे.

शेतीमध्ये उत्पन्न चांगले व्हावे पाऊस काळ चांगला व्हावा यासाठी गावकरी लक्ष्मी कडे साकडे घालतात. यावर्षी ८ मे २०२६ शुक्रवार रोजी या देवीची यात्रा आयोजित केली होती .महाप्रसादाचे नियोजन करण्यात आले होते.

**कला आणि क्रीडा यांचा अनोखा संगम!**

**कलाकारांमधील एकोपा आणि खिलाडूवृत्ती जोपासण्यासाठी स्पर्धांचे आयोजन**

# रंगकर्मी क्रिकेट लीगचा दिमाखदार ट्रॉफी आणि टी-शर्ट अनावरण सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : चंदेरी दुनियेतील कलाकार जेव्हा हातात बॅट आणि चेंडू घेतात, तेव्हा मैदानातही मनोरंजनाचा षटकार पाहायला मिळतो. रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रातील कलाकारांना एकत्र आणणाऱ्या बहुचर्चित रंगकर्मी क्रिकेट लीग (ठउङ) स्पर्धेचा अधिकृत ट्रॉफी आणि टी-शर्ट लॉन्चिंग सोहळा नुकताच मुंबईत मोठ्या थाटामाटात पार पडला. या सोहळ्याला श्री.श्रीकांत भारतीय आणि श्री. मंगेश सांगळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कलाकारांमधील एकोपा आणि खिलाडूवृत्ती जोपासण्यासाठी










अशा स्पर्धांचे आयोजन होणे काळाची गरज असल्याचे मत मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले. त्यांच्या उपस्थितीने सोहळ्याची रंगत द्विगुणित झाली. या स्पर्धेचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे संघांचे नेतृत्व करणारे दिग्गज कलाकार! यंदा मैदानात आपली रणनीती आखण्यासाठी सज्ज झाले आहेत: विजय पाटकर, सागर कारंडे, हरीश दुधाडे, कांचन पगारे, संचित यादव आणि नूपुर दुधवडकर या दिग्गज कलाकारांच्या सहभागामुळे प्रेक्षकांमध्ये स्पर्धेबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात संचित यादव आणि शितल कल्लापुरे यांनी मोलाची भूमिका बजावली. आकर्षक चकाकणारी ट्रॉफी आणि विशेष डिझाइन केलेले टी-शर्ट्स हे या संध्याकाळचे मुख्य आकर्षण ठरले. या उपक्रमाला पंडित राठोड, सचिन खांडागळे, संदीप राठोड, गणेश गारगोटे, ओमकार सर आणि अखिलेश चौबे या प्रायोजकांनी भक्कम पाठबळ दिले आहे. केवळ अभिनयच नाही, तर मैदानावरही आमची मैत्री आणि एकता दिसावी, हाच या लीगचा मुख्य उद्देश आहे. क्रिकेटप्रेमी आणि चाहत्यांसाठी ही एक पर्वणीच ठरणार आहे. या लीगचे सामने खालीलप्रमाणे रंगणार आहेत: दिनांक: १४ आणि १५ मे २०२६. ठिकाण: परळ सेंट्रल रेल्वे ग्राऊंड, मुंबई. अंतिम सामना हे या स्पर्धेचे विशेष आकर्षण असेल. तरी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आपल्या आवडत्या कलाकारांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. आता सर्वांचे लक्ष लागले आहे ते 'परळ'च्या खेळपट्टीवर... कोण उंचावणार विजयाची ट्रॉफी?

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ऐन उन्हाळ्यात वीज पुरवठ्याबाबत अडथळा; कर्तव्यदक्ष लोकप्रतिनिधींकडून दखल

## वीज पुरवठा पूर्ववत ठेवण्याच्या आमदार समाधान आवताडे यांच्या वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी : पंढरपूर व मंगळवेढा विभागात वीज पुरवठ्याबाबत येणाऱ्या अडचणीबाबत गुरुवारी मंगळवेढा येथे आमदार समाधान आवताडे यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकार्यांची बैठक घेऊन उन्हाळ्यात विजपुरवठा अधिक सुरळीत राहावा यासाठी सतर्क राहावे. याचबरोबर जळालेला ट्रांसफार्मर तीन दिवसाच्या आत मध्ये द्या, पण शेतीपंपाची विज पूर्ण दाबाने आठ तास द्या आणि सिंगल फेज वीज पूर्ण दाबाने द्या अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. याचबरोबर महावितरणचे अधिकारी व कर्मचारी यांना शेतकऱ्यांशी नम्रतेने बोलण्याबाबतच्या सूचना दिल्या. शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी पुरेशा प्रमाणात वीजपुरवठा व्हावा. यासाठी



विशेष नियोजन करण्याचे निर्देश आमदार समाधान आवताडे यांनी दिले.याप्रसंगी त्यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी कार्तिकेएन यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून वीजपुरवठ्याबाबत येणाऱ्या अडचणी निदर्शनास आणून दिल्या.

वाढत्या उन्हाळ्यामुळे वीजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असून, त्याचा परिणाम वीज वितरण यंत्रणेवर होताना दिसत आहे. शहरासह ग्रामीण भागात वारंवार वीजपुरवठा खंडित होणे, कमी दाबाने वीज मिळणे तसेच वीज जळण्याच्या घटनांत वाढ झाल्याने शेतकरी आणि नागरिक त्रस्त झाले आहेत.

गेल्या काही दिवसांत अनेक भागांतील वीज ट्रांसफार्मर जळाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे काही ठिकाणी तासन्तास वीजपुरवठा बंद राहिला. जळालेले अनेक ट्रांसफार्मर दुरुस्तीसाठी पडून असल्याने वीजपुरवठा सुरळीत करण्यात अडचणी निमार्ण होत आहेत. पंढरपूर मंगळवेढा तालुक्यामध्ये जवळपास ४५ ट्रांसफार्मर दुरुस्तीसाठी ऑइल नसल्यामुळे थांबलेले होते, त्यावेळी आमदार अधीक्षक अभियंता यांना भ्रमणध्वनी द्वारे कळवून २००० लिटरची व्यवस्था करण्यास सांगितले त्यामुळे पेंडिंग असलेले ४५ ट्रांसफार्मर लवकरात लवकर देण्यास सांगितले तसेच वाढलेल्या भारामुळे ट्रान्सफॉर्मर आणि वीजवाहिन्यांवर ताण येत आहे.

दरम्यान, भीमा नदीत पाणी सोडण्यात आलेले असून जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार औज आणि हीळ्ळी बंधाऱ्यापर्यंत पोहचे पर्यंत वीज पुरवठा तीन तास करण्यात आला होता आता त्याठिकाणी पाणी पोहचले असून वीजपुरवठा सुरळीत करणे संदर्भात पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी कार्तिकेयन साहेब यांना भ्रमणध्वनीद्वारे शेतकऱ्यांच्या अडचणी सांगून वीज पुरवठा पूर्वत करण्यात यावा असे सांगण्यात आला.

दोन्ही तालुक्यात कमी दाबाने वीज मिळत असल्याने नागरिकांना उकाड्यात मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पाण्याच्या मोटारी, शेतीपंप आणि घरगुती उपकरणे व्यवस्थित सुरू राहत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी पंढरपूर आणि मंगळवेढा विभागातील महावितरण अधिकाऱ्यांची बैठक घेऊन वीज पुरवठा पूर्ववत ठेवण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीदरम्यान आमदार समाधान आवताडे यांनी वीज वितरण विभागाच्या अधिकाऱ्यांना जळालेले डेपो त्वरित दुरुस्त करावेत, अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून द्यावेत तसेच कमी दाबाची समस्या दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात अशा सूचना केल्या.

तसेच कार्यकारी अभियंता शिंदे सर्व अधिकारी यांना आमदार समाधान आवताडे यांनी महावितरणचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांना नागरिक व शेतकरी यांच्याशी नम्रतेने बोलण्यात व वागण्यात यावे अशा सूचना दिल्या. यावेळी कार्यकारी अभियंता शिंदे साहेब, सहाय्यक कार्यकारी अभियंता देवकर उपकार्यकारी अभियंता मरळी उपकार्यकारी अभियंता अकोलकर. मंगळवेढा पंचायत समितीचे सभापती सौ दिपाली ताड पंढरपूर पंचायत समितीचे सभापती शुभम आगवणे जिल्हा परिषद सदस्य प्रदीप खांडेकर जिल्हा परिषद सदस्य रमेश भांजे जिल्हा परिषद सदस्य जनार्दन शिवशरण उपसभापती अर्जुन मल्लाळे पंचायत समिती सदस्य विनायक यादव विजय माने श्रीमंत म्हेत्रे सचिन चव्हाण दत्ता यादव व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

---

# बी.के.कावळे विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :

कर्मवीर राजाराम सखाराम वाघ शैक्षणिक व आरोग्य संस्था राजाराम नगर संचलित बी.के.कावळे माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय राजाराम नगर विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ८९% लागला असून पहिल्या पाच गुणवंतांमध्ये पहिल्या चार मुली यांनी भाजी मारली आहे.







विद्यालयाचे मुख्याध्यापक विलास जाधव माहिती देताना म्हणाले की,विद्यालयातून यावर्षी १४६ विद्यार्थी परीक्षार्थी होते त्यापैकी १३१ विद्यार्थी हे उत्तीर्ण झाले आहे यात विशेष गुणवत्तेत. ३३ प्रथम श्रेणीत. ६४ द्वितीय श्रेणी.३१ तृतीय श्रेणी ३ अशी संख्या आहे .

विद्यालयातील विद्यार्थी विकासासाठी व गुणवत्ता वाढीसाठी शालेय अध्यापनाबरोबरच ज्यादा मार्गदर्शन वर्ग प्रश्नपत्रिका लेखन सराव यासारखे अनेक उपक्रम

**पहिल्या पाच मध्ये चार मुलींनी मारली बाजी**

शिक्षकांनी राबविले.

कादवा कारखान्याचे चेअरमन श्रीराम शेटे, शिक्षण संस्था अध्यक्ष शहाजी दादा सोमवंशी उपाध्यक्ष सुभाष माधवराव शिंदे, सचिव बाळासाहेब पंढरीनाथ उगले व पदाधिकारी यांनी उत्तीर्ण विद्यार्थी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी विशेष शिक्षक यांचे अभिनंदन केले आहे.

विद्यालयातील पहिले पाच विद्यार्थी पुढील प्रमाणे

प्रथम - कुमारी वैष्णवी सुरेश महाले ९१%

द्वितीय- कुमारी स्नेहा नितीन उगले ९०.६०%

तृतीय -कुमारी श्रद्धा संतोष कावळे ८९.८०%

चौथा क्रमांक आयुषिकांत सूर्यवंशी ८६.८०% तर पाचवा क्रमांक दिव्या प्रभाकर सोनवणे ८६.६० टक्के हे पहिल्या पाच मधील गुणवत्ता विद्यार्थी आहे.

परिसरातून व शाळेच्या वतीने या गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले जात आहे

---

# उगाव छत्रपती शिवाजी हायस्कूलचा इयत्ता दहावीचा ९१.५७ टक्के निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी :

महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय, उगाव येथील इयत्ता दहावी (SSC) मार्च २०२६ परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून विद्यालयाने ९१.५७ टक्के निकाल लागला आहे.

यंदा परीक्षेसाठी विद्यालयातील ९५ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. त्यापैकी ८७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक परंपरेला विद्यार्थ्यांनी उजाळा दिला आहे. या यशामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षकवर्ग, पालक आणि ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम, नियमित अभ्यास, शिस्त आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर हे यश संपादन केले आहे.

यंदाच्या परीक्षेत प्रथम पाच विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळविले असून त्यांची नावे पुढीलप्रमाणे - कु. आव्हाड सिद्धेश्वरी बापू - ८८.६०%,

कु. जेऊघाले श्रावणी सुरेश - ८७.८०%, कु. शिंदे सायली शांताराम - ८७.६०%,

कु. शिरसाठ अनुष्का दिनेश - ८७.२०%, कु. आहेर यशराज किशोर - ८५.४०%,

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव (आण्णा) जोंधळे, सचिव/कार्याध्यक्ष . दत्ताभाऊ जोंधळे, ज्येष्ठ मार्गदर्शक दीपकभाऊ जोंधळे, विनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मधुकर आप्पा ढोमसे, उपाध्यक्ष साहेबराव आबा पानगव्हाणे, प्राचार्य कैलास गवळी, पर्यवेक्षक नंदाराम ढिकले, तसेच प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यालयाच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेचा हा निकाल उत्तम पुरावा असल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली

---

# दहावीचा निकाल लागल्यानंतर विद्यार्थ्यांचा जल्लोष



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दहावीचा निकाल जाहीर होतात विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांना निकाल पाहता यावा यासाठी आय आय कॉम्प्युटर्स पंढरपूर येथे मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. दिवसभरात जवळपास ७०० विद्यार्थ्यांनी इथे येऊन आपला निकाल पाहिला.

निकाल पाहिल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. यशस्वी विद्यार्थ्यांनी पेढे वाटून आनंद साजरा केला विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून यासाठी तब्बल ८५ कॉम्प्युटर इंटरनेट सह उपलब्ध करून देण्यात आले होते निकाल पाहण्यासाठी सकाळपासून विद्यार्थी व पालकांची मोठी गर्दी झाली होती निकालाची उत्सुकता शिक्षक विद्यार्थ्यांमध्ये पाहायला मिळाली यावेळी आयआयटी कॉम्प्युटर्स मधील सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या

---

**पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन**

# पत्रकारितेतील तळागळातील शब्दांना सलाम; पत्रकार व संपादक सन्मान सोहळा २०२६ चे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : समाजातील प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या आणि कोणत्याही परिस्थितीत सत्य मांडणाऱ्या पत्रकारांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आर्यारवी एंटरटेनमेंट 'तर्फे 'पत्रकार व संपादक सन्मान सोहळा २०२६ 'चे आयोजन करण्यात आले आहे.

अभिनय, दिग्दर्शन आणि पत्रकारिता क्षेत्रात ३० वर्षांहून अधिक काळ कार्यरत असलेले महेश्वर भिकाजी तेटांबे यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम साकारत आहे. 'आर्यारवी एंटरटेनमेंट 'या संस्थेच्या माध्यमातून महेश्वर तेटांबे यांनी सलग चार वर्षे राष्ट्रीय आणि आतंरराष्ट्रीय लघुपट महोत्सव, राज्यस्तरीय कराओके गीत गायन स्पर्धा, सेलिब्रिटी क्रिकेट मॅच असे अनेक उपक्रम राबवून ते यशस्वीरीत्या पार पाडले आहेत. आता त्यांनी 'आर्यारवी एंटरटेनमेंट 'च्या माध्यमातून 'पत्रकार, संपादक यांचा सन्मान सोहळा २०२६' हा उपक्रम हाती घेतला असून मुख्य प्रवाहातील माध्यमांसोबतच ग्रामीण भागातील मुक्त वार्ताहर, साप्ताहिक-पाक्षिकांचे प्रतिनिधी, डिजिटल न्यूज पोर्टल संपादक, तळागाळातील पत्रकार, संपादक आणि सोशल मीडिया माध्यमांतून कार्यरत पत्रकारांना या सोहळ्यात विशेष व्यासपीठ मिळणार आहे. तळागाळात काम करणाऱ्या पत्रकारांच्या योगदानाचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार असून, पत्रकारितेतील निष्ठा, निर्भीडपणा आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींना विविध पुरस्कारांनी सन्मानित केले जाणार आहे. या सन्मान सोहळ्यात 'स्वाभिमान लेखणी सन्मान पुरस्कार ''शब्दवेध गौरव सन्मान पुरस्कार' 'अजेय लेखणी सन्मान पुरस्कार, 'कलम-रत्न सन्मान पुरस्कार' आणि 'निर्भीड पत्रकारिता सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहेत. पुरस्कारासाठी इच्छुक पत्रकार, संपादक आणि डिजिटल मीडिया प्रतिनिधींनी आपली वैयक्तिक माहिती, कार्याचा संक्षिप्त परिचय आणि छायाचित्र दिनांक १५ जून, २०२६ पर्यंत आर्यारवी एंटरटेनमेंट, ७/५२, दिग्विजय मिल चाळ, दत्ताराम लाड मार्ग, काळाचौकी, श्रमुंबई - ४०००३३. भ्रमणध्वनी: ९०८२२९३८६७ / ८८७९८१०२९८. या संस्थेकडे पाठवावे, असे आवाहन संस्थापक महेश्वर तेटांबे यांनी केले आहे.

सदर पुरस्कार वितरण सोहळ्याची तारीख व स्थळ याबाबतची माहिती कार्यक्रमाच्या पंधरा दिवस अगोदर कळविण्यात येणार असल्याची नोंद घ्यावी, असेही आयोजकांनी स्पष्ट केले आहे. अधिक माहितीसाठी खालील समन्वयक यांच्याकडे संपर्क साधावा..गुरुनाथ तिरपणकर (पत्रकार) - ९३२३६६२६१९, राहुल खरात (पत्रकार) - ८३०८८०९७५४, केतन भोज (पत्रकार) - ८३६९५५४४१८

---

# मुरूम येथील प्रतिभा निकेतन विद्यालयाचा दहावीचा निकाल ९८.५३%, निकालात मुलींचीच बाजी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : येथील नगर शिक्षण विकास मंडळ संचलित प्रतिभा निकेतन माध्यमिक विद्यालयाचा एकूण निकाल ९८.५३ टक्के लागला आहे. तर सेमी माध्यमाचा शंभर टक्के निकाल लागला आहे.शाळेने गेल्या अनेक वर्षांपासूनची निकालाची परंपरा कायम राखली आहे.या विद्यालयाचे विद्यार्थी विशेष प्रविण्यासह १४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

यावर्षी विद्यालयातुन सेमी १३६ माध्यमाच्या तर मराठी माध्यमाच्या ६९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती.यात विशेष प्राविण्यासह १४८ ,प्रथम श्रेणीत ४५, द्वितीय श्रेणीत ८ ,तृतीय श्रेणीत १ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. कांबळे ऋतुजा मोहन या विद्यार्थिनीने ९८.४० टक्के गुण व गणित विषयात पैकीच्या पैकी गुण मिळवत विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. पाटील श्रुती गणपत व पाटील कल्याणी शंकर या विद्यार्थिनींनी ९६.४० टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तर पाताळे सुप्रिया शरणाप्पा या विद्यार्थिनीने ९५.८० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक पटकावले आहे.विद्यालयाचे ३२ विद्यार्थी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवत उत्तीर्ण झाले आहेत. माजी मंत्री बसवराज पाटील, संस्थेचे अध्यक्ष बापुराव पाटील, प्राचार्य उल्हास घुरघुरे, उपमुख्याध्यापक राधाकृष्ण कोंढारे, पर्यवेक्षक विवेकानंद परसाळगे आदींसह शिक्षक शिवशरण तांबडे, बसवराज पाटील, इरफान मुजावर, सुरेश कांबळे, एम एस चव्हाण, प्रशांत मुरूमकर, पवन पाटील तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन कले आहे. शहर व परिसरातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे कौतुक होत आहे.

# पंढरपूर येथील यमाई तलाव लागत असलेली जागा गो शाळेसाठी मंदिर समितीला दिल्या

## जनआंदोलन करण्याचा यमाई तलाव बचाव समितीचा इशारा; जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांना दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर येथील माळी तलाव लागत असलेली जागा गोशाळेसाठी मंदिर समितीला देऊ नये म्हणून पंढरपूर नगरपालिकेची उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे माजी नगराध्यक्ष व नगरसेवक लक्ष्मण शिरसाठ गटनेते सुजित कुमार सर्व गोड नगरसेवक अँड सुनील वाळूजकर अमोल डोके अँड गुरुदास अभ्यंकर धर्मराज घोडके सौरभ थिटे, इब्राहिम बोहरी शरद माने अमोल शेंबडे, शिंदे नाईक, जिल्हाधिकारी कीर्तीकीयन एस यांना निवेदन दिले.

पंढरपूर शहरातील यमाई तलावाजवळील जागा ही विठ्ठल रुक्मिणी गोशाळेचा विस्तार करण्यासाठी गट नंबर ३६१ ३.१२ हेक्टर ही जागा महसूलमंत्र्याकडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय मुंबई विकी बैठक झाली या बैठकीमध्ये मंदिर समिती व काही महाराज मंडळींच्या म ागणीवरून पंधरा दिवसाच्या आत जागा मागणी बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठवण्याचा म्हणून सूचना दिलेल्या आ-हेत शासनाच्या या न्यायाने समस्त पंढरपूरकरांच्या मनाम ध्ये प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. वास्तविक पाहता यामुळे तलाव हा ऐतिहासिक तलाव म्हणून निरंजनच्या काळामध्ये संपूर्ण पंढरपूर शहराला शहराला या जागेच्या तलावात बांध घालून १९८२ साली पाणीपुरवठा करण्यासाठी त्याचा वापर महाराष्ट्र शासना-ची नोंद असली तरी. पूर्वीप-ासून ही जागा नगरपालिकेच्या व माहितीच्या असल्यामुळे. या जागेची देखभाल व साफसफाई नगरपालिका करत आहे.

आजी या जागेची देवाल दुरुस्ती नगरपरिषदेच्या फंडातून केली जात आहे तसेच माझी मुख्यमंत्री आदरणीय अजित दादा पवारही पंढरपूरमध्ये कार्यक्रम ासाठी आले असता मुळज आम दार प्रशांतराव परिचारक यांनी अजितदादा पवार यांना हा जुना तलाव दाखविला व पंढरपूर शहरांमध्ये असलेले नागरिक व दर्शनाच्या निमित्ताने येणारे लाखो भाविक यांना श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शना सोबत पर्यटनाचाही आनंद मिळावा म्हणून राज्यच सरोवर संवर्धन योजनेतून हा तलाव कोट्यावधी रुपये खर्च करून विकसित केला आहे व आज शासनाच्या माध्यमातून तत्कालीन अर्थमंत्री सुधीर मनगटे वाघ यांच्या संकल्पनेतून तुळशी वृंदावन यासारखे अतिशय सुंदर पर्यटन स्थळ निर्माण केले आहे तसेच या ठिकाणी असणाऱ्या पार्किंग ट्रॅक वर हजारो महिला व पुरुष नागरिक सकाळी संध्याकाळी फिरण्यासाठी याचा वापर करीत आहे त्यामुळे पंढरपूर शहरांमध्ये केवळ एक एम आय तलावाची जागा राहिली असून नागरिक सुरक्षितपणे व्यायाम करणे व ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणावर येत असतात त्यामुळे ही जागा गोशाळेसाठी देणे योग्य होणार नाही वास्तविकपदा मंदिर समि तीने यापूर्वीही नगरपरिषदेने तीन एकर जागा ठराव करून दिलेली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज विद्यापीठ व संत संत विद्यापीठ व दर्शन मंडपासाठी यामुळे याची प्रदूषण ही होणार आहे.

शासनाने यमाई तलाव परिसरामध्ये वाढती उप-नगरी वाढत्या लोकसंख्येमुळे ३० ते ४० वर्ष विचार करून भविष्यात नागरिकांना सुख सुविधा द्यावा लागणाऱ्या याचा साकल्याने विचार करून या ठिकाणी शासनाच्या वतीने पिकनिक पॉईंट ॲडिशनल वॉटर सप्लाईट टँक डेव्हलपमेंट तलाव विकसित करणे यासारखे आर-क्षणे जागेवर टाकलेली आ-हेत यामुळे तलाव सुशोभीकरण करणे तलावात असलेल्या जा-गेत ऑक्सिजन पार्क उभारणे खुल्या जागेत व्यायाम शाळा करणे तलावा लागत असलेल्या कृषी वृंदावनाच्या भरावयाचे



सुशोभीकरण करणे यासाठी एक कोटी ७१ लाख रुपयाचा निधी नुकताच नगरपरिषदेला दिला आहे व या तलावाच्या निवेदही प्रसिद्ध झालेली आहेत.

तरी या सर्व बाबीचा विचार करून शासनाने श्री विठ्ठल रुक्मि णी मंदिर समिती गोशाळेसाठी तीन ते १२ अर् जमीन देऊ नये अन्यथा पंढरपूर शहरातील सर्व राजकीय सामाजिक संघटना तसेच पंढरपूर नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष महादेव ढोकळे माजी नगराध्यक्ष व नगरसेवक लक्ष्मण शिरसाठ गटनेते सुधीर कुमार सर्व गोड नगरसेवक आणि सुनील वाळूजकर अमोल डोके धर्मराज घोडके सौरभ थेटे माजी नगरसेवक अंड गुरुदास अगंकर इब्राहिम बोहरी सामाजिक कार्यकर्ते शरद माने मालोजी शेंबडे गणेश शिंदे नाईक प्रमोद कदम हे उपस्थित होते उपनगर स्थापन केलेल्या यमाई तालाव बचाव समितीच्या वतीने जनार्दन केले जाईल असा इशारा यावेळी देण्यात आला.

---

## श्री तुळजाभवानी सैनिकी विद्यालयाचा एस.एस. सी. परीक्षेचा शंभर टक्के निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित ,श्री तुळजाभवानी सैनिकी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा (२०२६) इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे . या परीक्षेसाठी विद्यालयातील एकूण ५४ विद्यार्थी प्रविष्ट होते .त्यामध्ये विशेष प्राविण्य २४ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत २१ विद्यार्थी तर द्वितीय श्रेणीत ०९ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत . विद्यालयातील प्रथम तीन विद्यार्थी १) कदम आदेश दयानंद -९२%,२) लगडे देवराज बालाजी ९०.२०% ०३) मगर निखिल गोकुळ ८७.२०%.

**१००% निकालाची परंपरा कायम !**

यशाची परंपरा कायम ठेवत विद्यालयाने हे यश मिळवलेले आहे . या उज्वल यशाबद्दल श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सन्म ाननीय कीर्ती किरण पुजार, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे तह-सीलदार तथा व्यवस्थापक श्रीमती माया माने मॅडम, विद्यालयाचे आद-रणीय प्राचार्य डॉ. वैजनाथ घोडके सर, पर्यवेक्षक डॉ. पेटकर सर, तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे, सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे व पालकाचे अभिनंदन केले.

---

## सै. टाकळी वाडी श्रीधर सुतार यांच्या कन्येचे दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश; मान्यवरांकडून सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी प्रतिनिधी / संजय चव्हाण पत्रकार : टाकळी वाडी ता.शिरोळ जि.कोल्हापुर येथील सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले श्रीधर सुतार यांच्या कन्येने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून उत्कृष्ट गुणांनी परीक्षा उत्तीर्ण होत कुटुंबासह परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे.





तिच्या या यशाबद्दल आज श्रीधर सुतार यांच्या निव-ासस्थानी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पत्रकार संजय चव्हाण, सुनील म्हैशाळे, नामदेव निर्मळे. प्रशांत पिंपळे, पोपट खोत, धोंडीराम चावरे, आनंद उन्हाळे . सोमनाथ कुंभार शेखर परीट .महेश वनकुदे .संजय दानोळे. किरण मानदेशी .ठाकर.शालेय समीती शिक्षक ,शिक्षीका विद्यार्थी तसेच सर्व मित्रमंडळी उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द व मेहनतीच्या जोरावर मिळविलेल्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून व तीच्या आई-वडिलांचे कौतुक होत आहे. परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक, शैक्षणिक व मित्रपरिवारातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

---

## पंढरपूर ते पैठण बससेवा सुरू, प्रवाशी वर्गातून समाधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या पंढरपूर आगारातून पंढरपूर पैठण पंढरपूर बससेवा सुरू करण्यात आली आहे. राज्य परिवहन महामंडळ पंढरपूर आगार यांचेकडून प्रवाशी व भाविक भक्तांच्या मागणीन-ुसार विठ्ठल रूक्मिणी व एकनाथ महाराज भाविक भक्तांच्या सोईकरीता पंढरपूरहून नवीन विशेष बससेवा सुरू करण्यात येत आहे. ७ में रोजी बस सेवेचा शुभारंभ व्यवस्थापक योगेश लिंगायत व कौठाळी चे उपसरपंच रामदास नागटिळक यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. पंढरपूर पैठण बस सेवा सुरू करण्यासाठी आ.सम




ाधान आवताडे,मा.आ.प्रशांत परिचारक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.बस शुभारंभ प्रसंगी पंढरपूर आगाराचे प्रमुख अकुंश सलगर, वरिष्ठ लिपिक समाधान मेटकरी, बस स्थानक प्रमुख अंकूश सलगर यांच्या सह बहुसंख्य अधिकारी, कर्मचारी तसेच वाहक - चालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान कौठाळीचे उपसरपंच रामदास नागटिळक यांनी गेले वर्षापासून पंढरपूर पैठण बस सेवा सुरु करण्याची मागणी परिवहन मंत्री नामदार प्रताप सरनाईक, आ. समाधान आवताडे, मा.आ.प्रशांत परिचारक यांच्याकडे केली होती.

सदरची बस दैनंदिन पंढरपूर ते पैठण दुपारी २.३० वाजता पंढरपूरहून निघुन ती पैठण येथे रात्री ९.०० वाजता पोहोचेल, तसेच दैनंदिन पैठण ते पंढरपूर सकाळी ०६.३० वाजता बस निघाल्या नंतर पंढरपूर येथे दुपारी १२.३० वाजता पोहोचेल. सदर बस हि पंढरपूर, टेंभुर्णी, करमाळा, पाथर्डी, पैठण या मार्गावरून धा-वणार आहे.

प्रवाशी बांधवांनी या सेवेचा पुर्णपणे लाभ घ्यावा असे आवाहन राज्य परिवाहन महामंडळ पंढरपूर आगारा मार्फत करण्यात आले. दरम्यान पंढरपूर ते पैठण या मार्गे जाणारी बस सेवा पहिल्यांदाच सुरु केल्याने भाविक व प्रवाशी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

---

## पाडळी पाताळेश्वर विद्यालयाची संजना बोगीर झाली ठाणे पोलीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नुकतीच पाडळी पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु.संजना भीमराव बोगीर ही. OBC मधील असुन उत्कृष्ट मेरीटमुळे तिची ओपन मधुन निवड झाली . तिला पेपर मधे १०० पैकी ८५ गुण मिळाले व ग्राउंड मधे ५ पैकी ४५ गुण मिळवून मुलींमधे सर्वोत्कृष्ट गुण मिळवून तिची ठाणे शहर पोलीस म्हणुन निवड झाली आहे

**संजना इ ५ वी पासुनच अतिशय जिद्दी व मेहनती हुशार मुलगी आहे असे उद्गार तिच्या शिक्षकांनी काढले पाताळ-ेश्वर विद्यालयाचे आत्ता पर्यंत ३०० पेक्षा जास्त विद्यार्थी सैन्य व पोलीस दलात भरती झाले असल्याचे एस .बी देशमुख यांनी सांगितले .**

यापुढे पोलीस दलातील स्पर्धा परिक्षा देवुन पोलीस आयुक्त / उपायुक्त होण्याचे तिचे स्वप्न आहे. या निवडीमुळे नुकताच तिचा सत्कार पाताळेश्वर विद्यालयाचे मा . मुख्याध्यापक व बाल विज्ञान विकास शिक्षण संस्थेचे विद्यमान - सेक्रेटरी - एस .बी. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी कांतीलाल पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी निफाड, हेमंतकुमार भामरे पोलीस निरीक्षक सिन्नर, भरत जाधव पोलीस निरीक्षक सिन्नर, उपनिरिक्षक रूपाली चव्हान, अंकुश वारुंगसे, पोलीस पाटील संघटनेचे आर.आर. बोडके उपस्थित होते.




संजनाचे पाडळी व सिन्नर परिसरातून विशेष कौतुक केले जात आहे.

---

**१०७१ लाभार्थ्यांनी घेतला लाभ**

**कार्यालयात येऊन नागरिकांनी निसंकोच आपली कामे करून घ्यावीत : उपविभागीय अधिकार गणेश शिंदे**

## कळंब येथील छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये लाभार्थ्यांचा उस्फुर्त सहभाग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : आपली कामे तात्काळ व्हावीत व सेवा तळ-ागाळातील लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहंचावी यासाठी महाराष्ट्र शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान सुरू केले आहे. याशिवाय नागरिकांनी आ-पली कामे कसलाही संकोच न बाळगता नि संकोच,कार्यालयीन वेळेत संबंधित कर्मचारी अधिकारी यांच्याकडे करून घ्यावीत असे आ-वाहन शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी कळंब उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे यांनी केले.

कळंब तालुक्यात छत्रपती शिव-ाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिर टप्पा क्रमांक (१) म धील शेवटचे शिबिर दि.८ मे २०२६




रोजी कळंब येथील हनुमान मंदिर पुनर्वसन सावरगाव येथे सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत आयोजित करण्यात आले होते. या वेळी म हसुली व विविध विभागाच्या सेवा या शिबीराच्या माध्यमातुन देण्यात आल्या आहेत. या शिबीराचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फित कापुन करण्यात आले. महसूल विभागाशी संबंधित सेवा तळ-ागाळातील लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात यासाठी ७ मार्च ते १५ मे या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत आहे कळंब तालुक्यात येरमाळा, मस्सा, शिराढोण, नायगाव, मोहा, ईटकुर व शेवटी कळंब येथे हे शिबिर घेण्यात आले. यामध्ये फेरफार,अकृषिक एन.ए. तरतुदी बाबत मार्गदर्शन व सुधारणा,ई मोजणी अर्ज, सातबारा मधील चुकांची दुरुस्ती, नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र, नवीन व्यवस्थापना नुसार सनद प्रक्रियेची माहिती, ग्रीस्टॅक आणि पी.एम. किसान नोंदणी, डिजिटल स्वाक्षरी चे सातबारा आणि आठअ उताऱ्यांचे वाटप, विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लंघनाबाबत च्या प्रकरणाचा निपटारा, भूसंपादन व अकृषिक परवानगी प्रकरणे, उत्पन्न, रहिवासी आणि जातीचे प्रमाणपत्र, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे लाभ मंजूर करणे कमी जास्त पत्रके तयार करून गांव दप्तर अद्यावत करणे, शिधा मिळत नसलेल्या केसरी शिधापत्रिकावर धान्यवाटप सुरू करणे, जन्म व मृत्यू प्रमाणपत्र देणे या व इतर महसुली सेवा या शिबिरामध्ये देण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रमासाठी उपविभागीयअधिकारी गणेश शिंदे, नायब तहसीलदार राजेश तापडिया,नगराध्यक्षा सुनंदा कापसे, शिवसेना धाराशिव जिल्हाप्रमुख अजित (दादा ) पिंगळे, नगरसेवक रोहन पारख, अतुल कवडे, शितल चोंदे, भूषण करंजकर, आमर चाऊस, दीपक हारकर, पूजा धोकटे, जमील कुरेशी, शकील काझी, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक प्रणव चव्हाण, पंचायत समिती माजी सभापती भास्कर दादा खोसे कळंब तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे, पुरवठा विभागाचे रमेश पवार, विद्या रणदिवे, निवडणूक विभागाचे पाचभाई, मंडल निरीक्षक गणेश जगताप, तलाठी पूजा गायकवाड, कळंब नगरपरिषद कार्यालयीन अधिकारी एल. एस. वाघमारे यांच्यासह सर्वच विभागाचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

या शिबीरामध्ये महसुल विभागासह भुमीअभिलेख, ग्रामविकास, कृषी, महिला व बालकल्याण, एस.टी.म हामं डळ, आरोग्य, शिक्षण, आधार व सेतु सुविधा केंद्र , कळंब नगर परिषद व विविध विभागांचा सहभाग होता. वेगवेगळया विभागाचे स्टॉल लावण्यात आले होते. शिबिरासाठी ६६८ नागरिक उपस्थित होते. या शिबिरात, १०७१ लाभार्थी संख्या होती. नागरिकांनी या शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.